# मेट्रो-३ भुयारीकरणाचे सोळा टप्पे पूर्ण!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील पहिलावहिला भुयारी मेट्रो मार्ग कुलाबा-सीप्झ या मार्गावर सुरु असून नुकतेच या मार्गावरील भुयारीकरणाचे १६ टप्पे पूर्ण झाले. सहार रोड मेट्रो स्थानकातून तापी १ हे टनेल बोअरिंग मशीन (टीबीएम) भुयारीकरण पूर्ण करून बाहेर आले. तापी १ (टीबीएम) यंत्राने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल २ ते सहार रोड मेट्रो स्थानक हे ६८७ मीटर अंतराचे भुयारीकरण पूर्ण केले. या भुयारामुळे मेट्रो ३ च्या एकूण मार्गिकेवरील ३१.६८७ किमी भुयारीकरण आता पूर्ण झाले.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल २ येथून २२ एप्रिल २०१९ रोजी तापी १ भुयारीकरणाला सुरुवात

**३१.६८७ किमी भुयारीकरण पूर्ण**

केली होती. पॅकेज ६ अंतर्गत सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (टर्मिनल २) ते सहार रोड या टप्प्यातील अप आणि डाऊन अशी दोन्ही भुयारे पूर्ण झाली आहे.

सोळाव्या टप्प्याचे भुयारीकरणाच्या कामासाठी तापी १ हे टीबीएम २२ एप्रिलला जमिनीखाली उतरवण्यात आले होते. मात्र तब्बल १०५ दिवसांनी मोहीम फत्ते करुनच सोमवारी ते बाहेर काढण्यात आले. हा भुयारी टप्पा जमिनीपासून २५ मीटर खोल असूनही भुयारीकरणादरम्यान कोणताही अडथळा आला नाही.